**पुणे महानगरपालिका**

मनपा मुख्य इमारत,

शिवाजीनगर

पुणे –४११००५

# सुधारित जाहिरात

## भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्रेणी 'क' मधील तांत्रिक संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठीची रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

### ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचे दिनांक | ०१/१०/२०२५ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३१/१०/२०२५, वेळ २३:५९ पर्यंत |
| ३ | ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | ०१/१०/२०२५ ते ३१/१०/२०२५ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | यथावकाश घोषित केली जाईल |

*** परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. संभाव्य बदला बाबत वेळोवेळी पुणे महानगरपालिका संकेत स्थळावर माहिती प्रसारित केली जाईल.**

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (श्रेणी -३) उपलब्ध पदे व पद संख्या**

**'परिशिष्ठ-अ'**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जागा | १६ | १९ | २ | ४ | ५ | ३ | ४ | ३७ | १७ | १८ | ४४ | १६९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणखालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | ४ | ६ | १ | २ | २ | २ | २ | १० | ५ | ५ | १५ | ५४ |
| १) महिला (३०%) | ४ | ५ | ० | १ | १ | १ | १ | १० | ५ | ५ | १३ | ४६ |
| २) माजी सैनिक (१५%) | २+३* | ३+१* | १* | १ | १+१* | ० | १ | ५+४* | ३ | २+२* | ६+१* | ३७ |
| ३) अंशकालीन (१०%) | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | २ | ४ | १४ |
| ४) खेळाडू (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| ५) प्रकल्पग्रस्त (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| ६) भूकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ७) दिव्यांग (४%) | a) LV- १, b) D, HH – २, c) OA, BA,OL, BL,Dw, AAV - २, d) SLD, MI& e) MD involving (a) to (d) above – १+१*, (एकूण-७) याप्रमाणे दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येतील. | | | | | | | | | | | |
| ८) अनाथ (१%) | ०२ | | | | | | | | | | | |

टीप :- * पूर्वीचा माजी सैनिक व दिव्यांग अनुशेष

(सदर जाहिरातीला अनुसरून पूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुनश्च: अर्ज सादर करू नयेत, त्यांनी सादर केलेले अर्ज गृहीत धरण्यात आलेले आहेत. जर उमेदवारांनी नव्याने अर्ज सादर केल्यास पूर्वीचा अर्ज बाद होऊन नवीन केलेला अर्ज गृहीत धरण्यात येईल.)

Mahabharti.in

१.१ उक्त नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बिंदू नामावलीनुसार बदल होण्याची शक्यता आहे. सदर जाहिरातीमध्ये प्रस्तावित केलेली पदसंख्या आणि बिंदूनामावलीनुसार आरक्षणामध्ये भरती प्रक्रियेदरम्यान मे.शासनाच्या निर्देशांनुसार किंवा धोरणामध्ये काही बदल झाल्यास त्यानुसार होणारे बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

१.२ समांतर आरक्षणाबाबत शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण –१११८/प्र. क्र.३९/१६-अ दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण –१११८/प्र.क्र.४१७/१६-अ, दिनांक २८ डिसेंबर २०१८ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक राधाओ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५ जानेवारी २०२४ तसेच तद्नंतर शासनाचे या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा अंतिम निवडपूर्वी या संदर्भात निर्गमित होणाऱ्या आदेश नुसार कार्यवाही करण्यात येईल. **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:बीसीसी२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७/०२/२०२४ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता (एसईबीसी)१०% आरक्षण लागू राहील.**

१.३ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी १०% आरक्षण लागू राहील.

१.४ दिव्यांग आरक्षणाबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग–२००४/५५/आ-२,दिनांक-२७/०७/२००४, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–२००४/६३९/प्र.क्र.९६/न.वि.-६,दिनांक-११/०२/२००९, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०२१/प्र.क्र.३३/नवी-२८,दिनांक-१६.०४.२०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१.५ शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे २०१९ नुसार शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींसाठी ४% आरक्षण विहित करणे व आरक्षण अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार आरक्षण लागू होणाऱ्या पदांची माहिती पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्ये/जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | महानगरपालिकेतील स्थापत्य विषयाची कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामाअंतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याची देखरेख व नियंत्रण, कामांचा दर्जा तपासणे. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे. | S,ST,W,BN, MF, RW, SE, H,C | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA,OL, BL,Dw, AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

**FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED**:S-Sitting, ST-Standing, W-Walking, BN-Bending, L-Lifting, KC-Kneeling & Crouching, JU-Jumping, CRL- Crawling, CL-Climbing, PP- Pulling & Pushing, MF-Manipulation with Fingers, RW-Reading & Writing, SE-Seeing, H-Hearing, C-Communication

**CATEGORY ABBREVIATIONS USED**: B-Blind, LV-Low Vision, D-Deaf, HH- Hard of Hearing, OA-One Arm, OL-One Leg, BA-Both Arms, BL-Both Leg, OAL-One Arm and One Leg, BLOA-Both leg & one arm, BLA-Both Legs Arms, CP-Cerebral Palsy, LC-Leprosy Cured, Dw-Dwarfism, AAV-Acid Attack Victims, MDy-Muscular Dystrophy, ASD Autism Spectrum Disorder (M= Mild, MoD-Moderate), ID- Intellectual Disability, SLD-Specific Learning Disability, MI- Mental Illness, MD-Multiple Disabilities.

१.६ महिला, खेळाडू, दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक, भूकंपग्रस्त, अंशकालीन, प्रकल्पग्रस्त यांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

१.७ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१.८ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दि.२ सप्टेंबर १९८३ अन्वये

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५ टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. |
| १.९ | शासन निर्णय क्रमांक- महिला२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.०४.०५.२०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचा अधिवास (Domicile) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (खुला प्रवर्ग/अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. |
| २.० | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/-अ, दि.१२.०२.२०१९ व दि.३१.०५.२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

| **२ . वेतनश्रेणी – पुणे महानगरपालिका ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **वेतन श्रेणी** |
| १ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | वेतन श्रेणी S- १४, ३८६०० - १२२८०० |

| | |
|---|---|
| ३ | **पात्रता-** |
| ३.१ | उमेदवार भारतीय नागरिक असावा. |
| ३.२ | **शैक्षणिक अर्हता व अनुभव- पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ व वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार(शासन निर्णय क्रमांक पीएमसी-२०२३/प्र.क्र.१५६/नवि -२२ दि. १४ डिसेंबर, २०२३)** |

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती** |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी ३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पूर्णवेळ पदवी/पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक. |

## ४. वयोमर्यादा :

| **वयोमर्यादा (दिनांक २५/४/२०१६ चे शासन निर्णयानुसार) गणनेचा दिनांक** | **वयोमर्यादा** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **किमान अमागास/ मागासवर्गीय अनाथ** | **कमाल** | | **प्राविण्य प्राप्त खेळाडू (कमाल)** | | **दिव्यांग / दिव्यांग माजी सैनिक, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त (कमाल)** | | **स्वातंत्र्य सैनिकाचा पाल्य उमेदवार (कमाल)** | **अंशकालीन उमेदवार (कमाल)** |
| | | **अमागास** | **मागासवर्गीय/ अनाथ** | **अमागास** | **मागासवर्गीय** | **अमागास** | **मागासवर्गीय** | | |
| **अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक** | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४५ | ४५ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत | ५५ |

| | |
|---|---|
| ४.१ | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील. |
| ४.२ | शासन निर्णय क्र. एसआरव्ही- १०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६/०६/२००१ नुसार दिव्यांग उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. |
| ४.३ | दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादितील सवलत, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्र क्र.मासैक१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६अ, दि.२०/०८/२०१० प्रमाणे वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. |
| ४.४ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादित सवलत- उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| ४.५ | महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.पीएमसी-३०१४/प्र.क्र.२,दि.०४/०९/२०१४ अन्वये पुणे महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासन मान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल. तसेच शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२ दि.०१ नोव्हेंबर २००३ मधील तरतूदीनुसार ज्या पदांसाठी अनुभव आवश्यक आहे असे पदांसाठी शासन सेवेतील उमेदवारांची वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८+५=४३ वर्ष ( online अर्ज सादर करावयाच्या दिनांकापर्यंत) व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३+५=४८ (online अर्ज सादर करावयाच्या दिनांकापर्यंत) शिथिल करण्यात येत आहे. |

Manabharti.in

| | |
|---|---|
| ४.६ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्यांसाठीचे वय ४५ वर्षे इतके राहील. |
| ४.७ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अशंका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.०२/०१/२०१९ नुसार पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी निश्चित करण्यात आलेली ४६ वर्षे ही वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी शिथिल करण्यात आलेली आहे. |
| ४.८ | **अर्जदाराचे वय अर्ज करते वेळी उपरोक्त नमूद वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.** |

५ **निवड पध्दत:**

| | |
|---|---|
| ५.१ | जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करून अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. |
| ५.२ | परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणेत येणार आहे, परीक्षेचे ठिकाण दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच पुणे महानगरपालिका अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्धीस देऊन माहिती कळविण्यात येईल. |
| ५.३ | उमदेवारांना आवश्यक केलेली अर्हता अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. |
| ५.४ | शासन निर्णय प्रनिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३.अ दि.४ मे २०२२ अन्वये गट-ब व गट-क मधील पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |
| ५.५ | उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
| ५.६ | परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५.७ | **सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची / उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.** |
| ५.८ | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे. ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नाबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| ५.९ | पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविणेत येईल. |
| ५.१० | कागदपत्रे पडताळणीसाठी **शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ.** बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ५.११ | कागदपत्रे तपासणीनंतर निवडयादी व प्रतिक्षा यादी पुणे महानगरपालिकेच्या https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५.१२ | प्रमाणपत्र तपासणीकरीता येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वसाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. |
| ५.१३ | पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा E-mail द्वारे कळविण्यात येईल. तसेच अर्जदाराने अर्जात नमूद केलेला ई-मेल व मोबाईल क्रमांक कार्यरत असल्याची खात्री करायची आहे. |
| ५.१४ | कृपया नोंद घ्या की नोंदणी प्रक्रियेनंतर, प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. पुणे महानगरपालिकाद्वारे एकदा लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवारांना ई-मेल,SMS द्वारे त्याबद्दल सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्यांचे प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| **६** | **समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :** |
| ६.१ | अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| | ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु. क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | क) वरील अनु. क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता ( पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा. |
| | ड) वरील अनु. क्र. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा. |
| ६.२ | सेवाप्रवेश नियम /जाहिरात /अधिसुचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी. |
| ६.३ | वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |
| टीप:- | १) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय १२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य(पत्नी/मुलगे/मुलगी) होय.<br>२) पुणे महानगरपालिका सेवाप्रवेश नियमामधील अनुभवास प्राधान्य असा उल्लेख असेल, अशा पदाबाबत अ.क्र. ६.१ ते ६.३ मध्ये नमूद प्रमाणे उमेदवार उपलब्ध न झालेस प्राधान्य, असा घेणेत येईल. |

**७. अर्ज, अर्हता, इत्यादी :**

| | |
|---|---|
| ७.१ | पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| ७.२ | महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तसेच मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास मा. महापालिका आयुक्त, पुणे यांना तसे कळविण्याची आवश्यकता नाही. |

**८. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :**

| | |
|---|---|
| ८.१ | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://www.pmc.gov.in/b/recruitment या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| ८.२ | **उमदेवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास http://cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा 1800 222 366 / 1800 103 4566 या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.** |
| ८.३ | **ऑनलाईन फी भरणेसाठी दि. ३१/१०/२०२५ वेळ २३.५९ पर्यंत मुदत राहील.** |
| ८.४ | अर्जात हेतुपरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्या नंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल. |
| ८.५ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. |
| ८.६ | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल. |
| ८.७ | गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी. |
| ८.८ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.<br>१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.<br>२. अर्ज सादरीकरण<br>३. शुल्क भरणा |

८.९ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.

१. https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३.उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रकियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.


४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र /फोटो (रुंदी ३.५ से.मी.x उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) विहित आकार/ क्षमतेप्रमाणे **काळया शाईच्या (बॉल) पेनने** स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## A. अर्ज नोंदणी

1. उमेदवारांनी www.pmc.gov.in या संकेतस्थळावर जाण्यासाठी https://www.pmc.gov.in/b/recruitment "APPLY ONLINE" या पर्यायावर क्लिक करा जे एक नवीन स्क्रीन उघडेल.
2. अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल-आयडी प्रविष्ट करा.प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल.उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.
3. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो "सेव्ह आणि नेक्स्ट" टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाइन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाइन अर्जातील तपशीलांची पडताळणी

Mahabharti.in

करण्यासाठी "सेव्ह आणि नेक्स्ट" सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

4. उमेदवारांनी ऑनलाइन अर्जात भरलेले तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.
5. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे/तिचे वडील/पती इ.चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.
6. तुमचे तपशील सत्यापित करा आणि 'तुमचे तपशील सत्यापित करा' आणि 'जतन करा आणि पुढील' बटणावर क्लिक करून तुमचा अर्ज जतन करा.
7. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.
8. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी पूर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.
9. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा, आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच 'नोंदणी पूर्ण' वर क्लिक करा.
10. 'पेमेंट' टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे.

## B. परीक्षा शुल्क भरणे

ऑनलाइन मोड:

1. डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड्स/मोबाइल वॉलेट वापरून पेमेंट केले जाऊ शकते.
2. व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती तयार होईल.
3. 'ई-पावती' तयार न होणे अयशस्वी फि प्रदान दर्शविते.
4. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घेणे आवश्यक आहे.

## C. स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा/तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

❖ **छायाचित्र प्रतिमा:** (4.5cm × 3.5cm)

- छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.
- हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या, पार्श्वभूमीच्या विरुद्ध घेतलेले असावे.
- टोपी, आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
- परिमाण 200 x 230 पिक्सेल (प्राधान्य )
- फाइलचा आकार 20kb–50 kb दरम्यान असावा
- स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार 50kb पेक्षा जास्त नसावा.

❖ **स्वाक्षरी:**

- अर्जदाराला काळया शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी लागेल.
  - परिमाण 140 x 60 पिक्सेल (प्राधान्य)
  - फाइलचा आकार 10kb - 20kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार 20kb पेक्षा जास्त नाही याची खात्री करा.

❖ **कागदपत्रे स्कॅन करणे:**

- स्कॅनर रिझोल्यूशन किमान 200 dpi वर सेट करा
- रंग true colour सेट करा

❖ कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:-

- ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.
- संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा”

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | ❖ तुमचा फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>1. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>2. ऑनलाइन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे<br>3. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.<br>**<u>टीप :-</u>**<br>ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी. |
| ८.१० | **अर्ज सादरीकरण :**<br>१. सदर अर्ज पुणे महानगरपालिकेच्या https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर दि. **<u>०१/१०/२०२५</u>** रोजी पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.<br>२. कृपया लक्षात घ्या कि उमदेवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन पद्धतीने अदा करावी. |
| ८.११ | **परिक्षा शुल्क :-**<br>**१. <u>खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु १०००/-</u>**<br>**२. <u>मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु ९००/-</u>**<br>**३. फक्त ऑनलाईन पद्धतीनेच शुल्क अदा करण्यात यावे.**<br>**४. माजी सैनिक/ दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.**<br>**५. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन चलनाची प्रत ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.** |
| ८.१२ | **सर्वसाधारण सूचना**<br>१. प्राप्त अर्जांच्या संख्येचा विचार करून निवड प्रक्रियेचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त व मा.कर्मचारी निवड समिती यांना राहतील.<br>२. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.<br>३. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.<br>४. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.<br>५. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.<br>६. पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.<br>७. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.<br>८. संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| ८.१३ | वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| ८.१४ | उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. |
| ८.१५ | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/ उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी. |
| ८.१६ | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. |
| ८.१७ | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| ८.१८ | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| ८.१९ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/ क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/ निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| ८.२० | ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखिल स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील, तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणा-या उमेदवारांनी पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. |

## ९. परीक्षा :

९.१ **प्रश्नपत्रिकेची संख्या – एक** एकूण गुण -२००

| अ.क्र. | पदनाम | विषय (प्रश्न संख्या) | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | मराठी(१५) , इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौद्धीक चाचणी(१५) | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान (१२ वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | अभियांत्रिकी विषयाशी संबंधित(४०) | पदवी/ पदविका परीक्षेच्या दर्जासमान | इंग्रजी | ४० | ८० | | |

प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.

| | |
|---|---|
| ९.२ | जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall-Ticket) https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वत: संकेतस्थळावरुन काढून घ्यावे. |
| ९.३ | परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.<br>**परीक्षा केंद्रांची शहरे उपलब्धतेनुसार निश्चित केली जातील.**<br>***परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असतील. अर्जदाराने मागणी केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य/नवीन केंद्र दिले जाऊ शकते. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.** |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| ९.४ | i. अपंग कल्याण आयुक्तालय यांचे दि. २० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२,दिनांक १८/०३/२०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल पल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात व्यवस्था करण्यास परवानगी घेता येईल. तसे अर्ज करतेवेळी संबंधित उमेदवाराने अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह सुस्पष्ट मागणी करणे आवश्यक आहे. अशी सहाय्यकाची मागणी न केल्यास ऐनवेळी सहाय्यकाची मदत घेता येणार नाही व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.<br>ii. लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग व्यक्तींसाठी मार्गदर्शक तत्त्वे :-<br>दृष्टिहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाइन परीक्षेदरम्यान त्यांच्या स्वत:च्या लेखनिकाचा वापर करू शकतात, खाली दिलेल्या (ii) आणि (iii) मर्यादेच्या अधीन राहून.<br>• उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.<br>• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.<br>• एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी लेखनिक काम करता येणार नाही.<br>• उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्यास लेखनिकाची शैक्षणिक अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे. त्याकरिता उमेदवाराने परीक्षेच्यावेळी Call letter सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज भरून देणे आवश्यक आहे. तसेच संबंधित लेखनिकाने शैक्षणिक अर्हतेचे साक्षांकित दस्तऐवज परीक्षेचे वेळी आणणे आवश्यक असेल.<br>• उमेदवार आणि लेखनिक या दोघांनाही उचित हमीपत्र द्यावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकेसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत. तर ऑनलाइन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल<br>• जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.<br>लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये. असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल<br>• फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल. जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.<br>• परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर चाचणी प्रशासक कर्मचाऱ्यानी परीक्षेनंतर लिखित प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.<br>iii) लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (locomotor disability and cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पाल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत (किमान ४०% दिव्यांग ) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे किंवा सवलतीचा वेळ अनुज्ञेय असेल<br>(iv) दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.<br>• दृष्टिहीन उमेदवार (ज्यांना ४०% पेक्षा कमी अपंगत्व आहे) चाचणीची सामग्री वर्धित (मॅग्निफाइड) फॉन्टमध्ये पाहण्याची निवड करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.<br>• जे उमदेवार परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना ही मार्गदर्शक तत्त्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे/स्पष्टीकरण, जर काही असतील, त्यानुसार बदलू शकतात |

| | |
|---|---|
| ९.५ | ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. |
| ९.६ | लेखी परीक्षेनंतर जरुरी प्रमाणे पात्र उमेदवारांना १:३ या प्रमाणात कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात येईल. |
| ९.७ | काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये / परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ९.८ | **ओळख पटवणे**<br>१) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / शासकीय कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहित ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>टिप :- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही .**<br>i) परीक्षेला उशिरा येण्याबाबत :- परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण **एक तास** आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.<br>ii) निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करण्यात येणारी कार्यवाही :-<br>उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| ९.९ | **परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने,**<br>१. अनुचित प्रकार करणे किंवा,<br>२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,<br>३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा, मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा,<br>५. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,<br>६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,<br>७. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे उद्धटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | **अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.**<br>१. पुणे महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.<br>२. जर उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल. |

**१०.परीक्षा केंद्र**

| | |
|---|---|
| १ | १. सदर परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर **"ऑनलाईन"** पद्धतीने परीक्षा घेतली जाईल<br>२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही<br>३. महापालिकेस परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील<br>४. महापालिकेस उमदेवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल, तसे ते दिले जाऊ शकते.<br>५. उमदेवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही.<br>६. एखाद्या परीक्षा केंद्रावर पुरेसे उमदेवार **"ऑनलाईन"** परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमदेवार झाल्यास महापालिकेस उमदेवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल. |

**११ .कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे.**

सदर परीक्षेच्या निकालानंतर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र |
| २ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पूर्ण वेळ पदवी/ पदविका |
| ३ | वयाचा पुरावा |
| ४ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गात असल्याबाबतचा पुरावा. |
| ५ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमदेवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र<br>(अज प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.) |
| ६ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अराखीव माहिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| १२ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १५ | महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (डोमासाईल) |
| १६ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्या बाबतचे प्रमाणपत्रे<br>(शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार) |
| १७ | शासन निर्णय मातंस२०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.४.०२.२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MSCIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |
| १८ | प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र |
| १९ | भूकंपग्रस्त प्रमाणपत्र |

Mahabharti.in

**१२. इतर सर्वसाधारण अटी / शर्ती / सूचना :**

| | |
|---|---|
| १२.१ | अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवाशी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तसाच अर्थ असेल. |
| १२.२ | जातीच्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १२.३ | विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड),विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला,खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १२.४ | **महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. एसटीसी-१०९९/प्र.क्र.१४/का.१०, दि. १६/०८/२००० मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांनी नियुक्तीपूर्वी / नियुक्तीवेळी जातवैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.** |
| १२.५ | उमेदवारांना परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त निवड सूची, अंतिम निवड व अतिरिक्त निवड सूची व इतर सर्व सूचना ह्या वेळोवेळी www.pmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. |
| १२.६ | उपरोक्त पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी MSCIT उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे किवा समकक्ष अहर्ता प्रमाणपत्र अनिवार्य आहे. मे महाराष्ट्र शासन माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र. मातस२०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दि.०४/०२/२०१३ व शासन निर्णय क्र. मातस२०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दि.१६/०७/२०१८ मध्ये विहित केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. १९/०३/२००३ नुसार गट-अ ते गट-क मधील (वाहन चालक वगळून) नियुक्त होणाऱ्या सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यानी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| १२.७ | निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर पुणे महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| १२.८ | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना (Defined Contribution Pension Scheme) लागु राहील. |
| १२.९ | शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-२६, दि.२१/११/२००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरूध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/ तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. |
| १२.१० | महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि. ०१/०७/२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.११ | उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची मा.वैदयकीय अधिक्षक, कोटणीस दवाखाना, महानगरपालिका रुग्णालय यांच्याकडून वैदयकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैदयकीय दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. |
| १२.१२ | उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, त्यास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे. |
| १२.१३ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| १२.१४ | नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवाराने विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/ करारपत्र इ. विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| १२.१५ | निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| १२.१६ | उपरोक्त पदाकरिता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अश्या उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी/ अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| १२.१७ | भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित किंवा रद्द करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |
| १२.१८ | निवड झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करून दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या पदांना निवास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे अशा पदांवर नियुक्ती झाल्यास दरमहा निवास भाडे देय राहणार नाही . |
| १२.१९ | उमेदवाराने या भरती प्रक्रिये संदर्भातील माहिती व सूचना पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया https://www.pmc.gov.in/b/recruitment वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी. |
| १२.२० | उपरोक्त पदाकरिता शासनाकडील किंवा खाजगी कंपनी कडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |
| १२.२१ | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी पुणे महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्याकरिता उमेदवाराने दररोज पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील. |
| १२.२२ | निवड झाल्यास उमेदवारास ५०० रुपयांच्या मुद्रांक पत्रावर नोटरी समोर आवेदनपत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र नियुक्तीपूर्वी सादर करावे लागेल. |
| १२.२३ | महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक असतील. |
| १२.२४ | परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय नाही. |
| १२.२५ | उमेदवारांनी अर्ज करण्याच्या दिनांकास सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. |

## १३. इतर कलमे

| | |
|---|---|
| १३.१ | परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छुक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार प्रक्रियेतून नाकारले जातील. |
| १३.२ | भरतीशी संबंधित सर्व बाबींमध्ये पुणे महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात पुणे महानगरपालिकेद्वारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| १३.३ | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या चाचणीच्या काठीण्य पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध सत्रांमधील गुणांकन समतुल्य (गुणांचे समानीकरण) केले जातील. केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्रे आवश्यक राहतील. |
| १३.४ | महापालिका वैयक्तिक उमेदवारांनी नोंदविलेल्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या बरोबर आणि चुकीच्या उत्तरांच्या मधील समानता शोधण्यासाठी करेल. या संदर्भात महापालिकेद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत उत्तरे सामायिक केली |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | गेली आहेत आणि मिळालेले गुण वैध नाहीत असा निष्कर्ष काढला गेला असेल, तर महापालिका संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत असून अशा अपात्र उमेदवारांचे निकाल रोखले जातील |
| १३.५ | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि/किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात कोणत्याही महापालिकेच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |
| १३.६ | जाहिरातीमध्ये नमूद केलेली सेवाप्रवेश नियमात नमूद शैक्षणिक किंवा तदनुषंगिक अहर्ता अर्ज सादर करणेच्या अंतिम दिनांकास उमदेवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |

## १४. कर्तव्ये व जबाबदा-या :

| | |
|---|---|
| १४.१ | उपरोक्त पदावरील अधिकाऱ्यास जी कर्तव्ये पार पाडण्याचे त्यांना निर्देश देण्यात येतील, ती कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्याचे महानगरपालिकेकडून फर्मावण्यात येईल, अशी अन्य कर्तव्ये पार पाडावी लागतील, मा. महापालिका आयुक्त व खाते प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करून कार्य करावे लागेल. |

## १५. विशेष सूचना :

| | |
|---|---|
| १५.१ | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |
| १५.२ | परीक्षा घेणाऱ्या संस्थेच्या धोरणानुसार परीक्षेनंतर कोणत्याही परीस्थितीत उमेदवारांना सोडविलेल्या प्रश्नपत्रिकेचा संच दिला जाणार नाही. तसेच फक्त उमेदवारास त्याचे मागणीनुसार Answer Key दिली जाईल. |
| १५.३ | महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे /अभिलेखे ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. |
| १५.४ | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल. |
| १५.५ | मध्यस्थ / ठग / पुणे महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत. |
| १५.६ | यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हा ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १५.७ | परीक्षेची वेळ, दिनांक,ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Call Letter) याबाबत वेळोवेळी पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. |
| १५.८ | प्राप्त अर्जांची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |

Mahabharti.in

**सही /-XXX**
**(नवल किशोर राम)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

**दिनांक : ०१/१०/२०२५**

**ठिकाण : पुणे**